# शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय,जळगाव

महाराष्ट्र शासनाची स्वायत्त संस्था

राष्ट्रीय महामार्ग क्र.०६, जळगाव ४२५ ००२

दुरध्वनी क.०२५७-२२८१५२२ फॅक्स क.०२५७-२२८१३१९

Websit: www.gcoej.ac.in E-mail-princoej@rediffmail.com


जा.क्र.शाअमज/वि.वि./२०२२/ 1681 दिनांक: 20 AUG 2022

विद्यार्थ्यांसाठी सुचना

## (शैक्षणिक वर्ष २०२२-२०२३ करीता नियमित तृतीय व चतुर्थ वर्ष बी.टेक प्रवेशाबाबत....)

या महाविद्यालयातील शैक्षणिक वर्ष २०२२-२०२३ करीता पुर्नप्रवेशित/ स्वायत्ततांतर्गत प्रवेशास पात्र असलेल्या सर्व विद्यार्थ्यांनी महाविद्यालयाच्या संकेतस्थळावर जाहीर केलेल्या फी तक्त्यात दर्शविल्याप्रमाणेच आपण ज्या संवर्गात आहोत त्या संवर्गास लागु असलेले प्रवेश शुल्क (Fee Structure मध्ये जाहीर केलेली संपुर्ण सुचना काळजीपुर्वक वाचुन) दिनांक -२३/०८/२०२२ पासुन ते दिनांक-३०/०८/२०२२ पर्यंत SBI Bank च्या संकेतस्थळावरील SBI Collect या टॅब द्वारे भरावे. तसेच ज्या विद्यार्थ्यांना NEFT/RTGS/Googlepay/Phonepay/Netbanking ने फी भरायची आहे अशा विद्यार्थ्यांनी व ज्या विद्यार्थ्यांना शैक्षणिक कर्ज घ्यावयाचे आहे अशा विद्यार्थ्यांनी खाली नमुद केलेल्या बँक खात्यात फी जमा करून फी भरल्याची पावती आपल्याकडे जतन करून ठेवावी व प्रवेश घेतांना सादर करावी.

तसेच असेही कळविण्यात येते की,ज्या विद्यार्थ्यांचा प्रवेश संस्थास्तरावरील प्रवेश फेरीमधे झालेला आहे.अशा Against cap विद्यार्थ्यांनी फी तक्त्यामधे दर्शविल्याप्रमाणे फी भरावी. भविष्यात सदर विद्यार्थ्यांचे फी सवलतीचे अर्ज संबंधीत विभागाकडून मंजुर झाल्यास त्यांनी भरलेली रक्कम त्यांना परत करण्यात येईल.

तथापि, ज्या विद्यार्थ्यांची जात पडताळणी प्रमाणपत्रा अभावी किंवा अन्य कारणास्तव प्रवेशित वर्षातील अद्याप पर्यंत पात्रता झालेली नाही. परंतु, अशा विद्यार्थ्यांना जरी प्रवेश देण्यात येत असेल तरी अशा विद्यार्थ्यांच्याबाबत वरिष्ठ कार्यालयाकडून ज्या पद्धतीने सुचना प्राप्त होईल त्याप्रमाणे कार्यवाही करण्यात येईल अथवा अशा विद्यार्थ्यांचा प्रवेश रद्द झाला तर त्यास विद्यार्थी स्वत: जबाबदार राहील.

तसेच नियमित द्वितीय,तृतीय व चतुर्थ वर्षाच्या सर्व विद्यार्थ्यांना कळविण्यात येते की, त्यांनी प्रथम संबंधित (antiragging.in) संकेतस्थळावर Anti Ragging चा form भरून त्याची Print Registration form सोबत आपआपल्या वर्गशिक्षकांकडे जमा करावी. जे विद्यार्थी दिलेल्या सुचने प्रमाणे कार्यवाही करणार नाही अशा विद्यार्थ्यांचा प्रवेश निश्चित केला जाणार नाही.महाविद्यालयाचा बॅंकेचा तपशिल पुढिल प्रमाणे आहे.

**Name :** **PRINCIPAL GOVT. COLLEGE OF ENGINEERING, JALGAON**
**Bank:** **STATE BANK OF INDIA**
**Branch Code:** **SHIV COLONY, JALGAON.**
**Account No. :** **35429367678**
**IFS Code :** **SBIN0012689**

वरील प्रमाणे नियमानुसार लागु असलेली महाविद्यालयाची प्रवेश फी भरल्यानंतर प्रवेश अर्जासोबत खालील तक्त्यात नमुद केल्याप्रमाणे प्रवेश अर्ज व त्यासोबत आवश्यक ते कागदपत्र जोडून सदर प्रवेश अर्ज कार्यालयात जमा करावा.अन्यथा दिलेल्या मुदतीनंतर सदर विद्यार्थ्याचा प्रवेश अर्जाचा विचार होणार नाही.याची प्रवेशास पात्र विद्यार्थ्यांनी नोंद घ्यावी.

| अ.क्र | वर्ग व शाखा | प्रवेशअर्ज जमा करण्याचा दिनांक | वेळ |
|---|---|---|---|
| १ | तृतीय वर्ष स्थापत्य | दि.२३/०८/२०२२ | सकाळी ११-३० ते दु.१-३० |
| २ | चतुर्थ वर्ष स्थापत्य | दि.२३/०८/२०२२ | दुपारी २-०० ते दु. ४-३० |
| ३ | तृतीय वर्ष संगणक | दि.२४/०८/२०२२ | सकाळी ११-३० ते दु.१-३० |
| ४ | चतुर्थ वर्ष संगणक | दि.२४/०८/२०२२ | दुपारी २-०० ते दु. ४-३० |
| ५ | तृतीय वर्ष यंत्र | दि.२५/०८/२०२२ | सकाळी ११-३० ते दु.१-३० |
| ६ | चतुर्थ वर्ष यंत्र | दि.२५/०८/२०२२ | दुपारी २-०० ते दु. ४-३० |
| ७ | तृतीय वर्ष अणुविद्युत | दि.२६/०८/२०२२ | सकाळी ११-३० ते दु.१-३० |
| ८ | चतुर्थ वर्ष अणुविद्युत | दि.२६/०८/२०२२ | दुपारी २-०० ते दु. ४-३० |
| ९ | तृतीय वर्ष उपकरणीकरण | दि.२९/०८/२०२२ | सकाळी ११-३० ते दु.१-३० |
| १० | चतुर्थ वर्ष उपकरणीकरण | दि.२९/०८/२०२२ | दुपारी २-०० ते दु. ४-३० |
| ११ | तृतीय वर्ष विद्युत | दि.३०/०८/२०२२ | सकाळी ११-३० ते दु.१-३० |
| १२ | चतुर्थ वर्ष विद्युत | दि.३०/०८/२०२२ | दुपारी २-०० ते दु. ४-३० |

**प्रवेश अर्जा सोबत पुढीलप्रमाणे कागदपत्र सादर करणे बंधनकारक राहील.**

१. Allotment Letter

२.जात वैधता प्रमाण पत्र (खुला प्रवर्ग वगळून)

३.पालकांचा उत्पन्नाचा दाखला व Non-Creamy layer (दिनांक ३१/०३/२०२३ पर्यंत वैध )

४.शै.व.२०२२-२३ चे प्रवेश शुल्क भरल्याची पावतीची छायांकीत प्रत

५. प्रथम/थेट द्वितीय वर्षापासून प्रवेश फी भरल्याच्या सर्व पावत्या.( छायांकीत प्रत )

६.मागील सत्रांचे ग्रेड कार्ड ( छायांकीत प्रत )

**टिप : १ प्रवेश अर्जासोबत कोणतेही मुळ दस्ताऐवज अथवा पावती जोडू नये केवळ छायांकीत प्रती सादर कराव्यात.**

**२ संबंधित विद्यार्थ्यांनी परिपुर्ण अर्ज भरून कार्यालयातील विद्यार्थी विभागात वर नमुद दिनांक व वेळेत न चुकता हजर राहून प्रवेश प्रक्रिया पुर्ण करावी. प्रवेश अर्ज महाविद्यालयाच्या संकेत स्थळावर उपलब्ध आहे.**

**३ Agianst-Cap विद्यार्थ्यांचे फी सवलतीचे अर्ज संबंधीत विभागाकडून नामंजुर झाल्यास अशा विद्यार्थ्यांना नियमानुसार खुल्या वर्गास लागू असलेली संपुर्ण फी भरणे बंधनकारक राहील.**

(डॉ.जी.एम.माळवटकर)
प्राचार्य
शासकीय अभि. महाविद्यालय,जळगाव

प्रत -१. मुख्य सुचना फलक/शैक्षणिक अधिष्ठाता

२. सर्व विभागप्रमुख यांचे माहीती व पुढील कार्यवाहीसाठी

२/- त्यांना कळविण्यात येते की, त्यांनी उपरोक्त सुचना आपल्या अभ्यासक्रमाच्या संबंधीत विद्यार्थ्यांच्या निदर्शनास आणुन द्यावी.

३. फी सवलत विभाग,कार्यालय यांचे माहीती व पुढील कार्यवाहीसाठी ( श्री पी.आर.तेली शिष्यवृत्ती विभाग )

२/- त्यांना कळविण्यात येते की, त्यांनी प्रवेशित झालेल्या सर्व विद्यार्थ्यांसाठी वेळोवेळी फी सवलतीप्रमाणे सुचना तयार करून त्याबाबत विहीत वेळेत व मुदतीत कार्यवाही करावी.तसेच विद्यार्थ्यांना त्यांच्या फी सवलती बाबत मार्गदर्शन करून विद्यार्थी फी सवलती पासून वंचित राहणार नाही याची खबरदारी घ्यावी.

४. रोखपाल विभाग, यांचे माहीती व पुढील कार्यवाहीसाठी

२/- त्यांना कळविण्यात येते की, त्यांनी दिलेल्या Fee Structure नुसार फी Upload बाबत संबंधीत बँकेला कळवावे व Upload केलेली फी तपासून पुढील कार्यवाही करावी. विद्यार्थ्यांनी भरलेल्या फी ची संपुर्ण माहिती निम्नस्वाक्षरीकार यांना वेळोवेळी सादर करावी.विद्यार्थ्यांनी फी भरल्यानंतर MIS मधे एन्ट्री करून अहवाल सादर करावा.तसेच विद्यार्थ्यांनी भरलेल्या Online fee च्या पावतीवर सही व शिक्का द्यावा.

५. श्री. एम.एस.चौधरी, प्र.प्रबंधक यांना माहीतीसाठी.

६. श्री. आर ए. दळवी डाटा एन्ट्री ऑपरेटर यांना संस्थेच्या संकेतस्थळावर अपलोड करणेसाठी. तसेच प्रवेशित विद्यार्थ्यांचा रोलकॉल तयार करावा.